# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक १०.०९.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) परिमंडळ क्र. ६ अंतर्गत कुख्यात गुंडांची टोळी हद्दपार :–**

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, परिमंडळ क्र. ६ अंतर्गत पोलीस ठाणे खापरखेडा हद्यीत राहणारे कुख्यात गुन्हेगार टोळी प्रमुख नामे १) अक्षय उर्फ डग्गम पुरूषोत्तम भोस्कर, वय २७ वर्षे, रा. शाम मंगल कार्यालयाजवळ, खापरखेडा, नागपूर तसेच, त्याचे साथीदार २) सुमित शेषराव वंजाळ, वय २८ वर्षे, ३) अनिकेत संध्यसेवक वासनिक, वय १९ वर्षे, ४) सुनिल रामदास वाघदरे, वय ४२ वर्षे, ५) पियुष हिरामण पाल, वय २० वर्षे, सर्व रा. वार्ड क्र. ४, खापरखेडा, नागपुर यांचेविरूध्द पोलीस ठाणे खापरखेडा व कोराडी हद्दीत टोळी तयार करुन, गंभीर स्वरुपाचे गुन्हे ज्यामध्ये दुखापत करणे, दमदाटी करणे, धमकी देणे, शिवीगाळी करणे, बेकायदेशिर जमाव करणे, जुगार अड्डा चालविणे, अग्नीशस्त्र बाळगणे, खंडणी मागणे, गैरनिरोध करणे ईत्यादी विविध गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्यांचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमांचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता खापरखेडा पोलीसांनी आरोपींविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १३/२०२६ दिनांक ०२.०९.२०२६ अन्वये सर्व गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केलेला आहे.


अक्षय उर्फ डग्गम


सुमित


अनिकेत


सुनिल


पियुष

**२) परिमंडळ क्र. ६, पोलीस ठाणे कोराडी अंतर्गत कुख्यात ०२ गुंड हद्दपार :–**

**अ)** परिमंडळ क्र. ६ अंतर्गत पोलीस ठाणे कोराडी हद्यीत **सेक्टर नं. १२, श्रीकृष्णधाम झोपडपट्टी, वॉक्स कुलरमागे, कोराडी, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार इसम नामे आतीष उर्फ ऑस्टीन रॉबर्ट फ्रान्सीस, वय २८ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे कोराडी हद्दीत गंभीर स्वरुपाचे गुन्हे ज्यामध्ये दुखापत करणे, दमदाटी करणे, धमकी देणे, शिवीगाळी करणे, अग्नीशस्त्र बाळगणे, खंडणी मागणे, गैरनिरोध करणे, दरोडा, खुन, खुनाचा प्रयत्न करणे ईत्यादी विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता कोराडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांचेकडे

सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १२/२०२६ दिनांक २१.०८.२०२६ अन्वये वरिल गुन्हेगारांस नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केलेला आहे.

**ब)** परिमंडळ क्र. ६ अंतर्गत पोलीस ठाणे जरीपटका हद्यीत **लुंबीनी नगर, विक्की किराणा दुकानाजवळ, जरीपटका, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार इसम नामे भावेश उर्फ यश सुनिल मेश्राम, वय २० वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत गंभीर स्वरुपाचे गुन्हे ज्यामध्ये दुखापत करणे, दमदाटी करणे, धमकी देणे, शिवीगाळी करणे, अग्नीशस्त्र बाळगणे, खंडणी मागणे, गैरनिरोध करणे, दरोडा, खुन, खुनाचा प्रयत्न करणे ईत्यादी विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता जरीपटका पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. ११/२०२६ दिनांक २१. ०८.२०२६ अन्वये वरिल गुन्हेगारांस नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केलेला आहे.



आतीष उर्फ ऑस्टीन



भावेश उर्फ यश

**<u>३) गुन्हेशाखा, युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :– घरफोडीचे यापुर्वी उघडकिस गुन्हयातील पाहीजे आरोपीस अटक, सोन्या–चांदीचा मुद्येमाल जप्त.</u>**

दिनांक ०३.०३.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ०१.०४.२०२६ चे १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, २५० यर्जुवेद, दिक्षीत नगर, कपिलनगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी महेश दयालदास मोटवाणी, वय ६३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलाचे घरी बॅगलोर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १०,०००/–रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने, चांदीचे सिक्के, डायमंड वॉच असा एकुण किंमती ८,३८,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपासात, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून यापुर्वी ०४ आरोपींना अटक करून एकुण १९,६५,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त केला होता. गुन्हयातील आरोपींनी काही सोने सराफा व्यापारी यास विकल्याचे सांगितले होते. दिनांक ०५.०९.२०२६ रोजी सोनाराकडुन ८० ग्राम सोने कि. ८ लाख रुपयाचा मुद्येमाल जप्त करण्यात आला होता.

वरिल गुन्ह्यामधील पाहीजे आरोपीबाबत मिळालेल्या नामे माहितीवरून आरोपी नामे फरदीन राजीक शेख, वय २५ वर्षे, रा. कमलानगर, सरकारी हॉस्पीटल जवळ, देसाईगंज, वडसा, जि. गडचिरोली यास दिनांक ०७.०९.२०२६ रोजी अटक करून, त्याचे ताब्यातुन २० ग्रॅम सोन्याची लगड व १२०९ ग्रॅम चांदी असा एकुण ४,४०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. वरील गुन्ह्यामध्ये आजपावेतो एकुण

३२,०५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कराडे, सपोनि. सचिन गायकवाड, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. चंद्रशेखर भारती, पोअं. विरेंद्र पांडे, निलेश श्रीपात्रे, प्रफुल्ल पारधी, रविंद्र राऊत, लक्ष्मीकांत सोनटक्के, राहुल पाटील, दिनेश महल्ले, सुनिल यादव, अजिंक्य घुले, मनिष मिश्रा व हंसराज ठाकुर यांनी सायबर चे पोउपनि. झिंगरे व त्यांचे टीमचे विशेष सहकार्याने केली.




**<u>(गुन्हे)</u>**

**<u>१) पोलीस ठाणे जरीपटका :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०८.०९.२०२६ चे २०.४५ वा. ते दिनांक ०९.०९.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. ३७, लाईन नं. ०३, दयानंद पार्कजवळ, कस्तुरबा नगर येथे राहणारे फिर्यादी भरत सुगनमोल लुला, वय ४७ वर्षे, यांनी त्यांचे घरासमोर त्यांची ह्युंदाई कंपनीची क्रेटा कार क्र. एमएच ४९ सिएच ८७७७ किंमती १७,००,०००/—रू. ची लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद कार चोरून नेली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. कौशल्या बाबर ९०९६६७६९३६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे शांतीनगर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०९.०९.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, फिर्यादी गोवर्धन हेमराज खोटे, वय ५० वर्षे, रा. घर नं. ए—३, सुदर्शन नगर, लालगंज, शांतीनगर हे त्यांची आई नामे सौ. लिलाबाई हेमराज खोटे, वय ८० वर्षे यांचेसह सुदर्शन नगर, प्रकाश महतो चे घरासमोरून पायदळ जात असता, त्यांचे मागुन येणाऱ्या चेतक मोपेड क्र. एम.एच. ४० सिडब्ल्यु ४२६६ चा चालक नामे जिगर राजेंद्र कलंतरी, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ४२१, गुडओली, कामठी, नागपुर याने त्याचे ताब्यातील मोपेड भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या

चालवुन फिर्यादीचे आईला मागुन धडक मारल्याने त्या खाली पडुन गंभीर जखमी झाल्या. जखमी यांना उपचाराकरीता समर्पण हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. ठाकुर ७६२००६८३८८ यांनी आरोपी मोपेड चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सक्करदरा :—** दिनांक १०.०९.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत सक्करदरा चौक, उड्डाणपुलावरून मुलगा नामे प्रजीत भिमराव वाहने, वय २१ वर्षे, रा. गायत्री नगर, जगनाडे चौक, नंदनवन झोपडपट्टी, गल्ली नं. ०३, नागपुर हा पुलावरून खाली पडल्याने गंभीर जखमी झाला. त्याचे ज्युपीटर दुचाकी वाहन उड्डाणपुलावर होते. पोलीसांनी त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. सुरेश पठाडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** श्रीमती आशा राजकुमार मानवटकर, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. २१२, सुयोग नगर, बोबडेचे घरी किरायाने, अजनी, नागपूर ह्या दिनांक ०७.०९.२०२६ चे १४.३० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, डोळे—काळे, अंगात— काळ्या रंगाची टी—शर्ट व राखाडी रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी :—** आशु लख्खु पाल, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. ७३, बोदड ले—आऊट, शशीकांत सोसायटी, मानकापुर, नागपूर हे दिनांक ०४.०७.२०२६ चे ११.०० वा. पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे, डोळे—काळे, अंगात— शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— उजव्या पायाला टाके लावल्याचे जुने निशान आहे.



श्रीमती आशा



आशु

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**

## अधिसूचना

### (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३ अन्वये)

ज्याअर्थी, आमचे असे निदर्शनास आले आहे की, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत काही ठिकाणी घरमालक/मालमत्ता धारक/एजेंट हे भाडेकरूना (फ्लॅट/खोली/घर) देतांना आवश्यक माहिती व पडताळणी संबंधित पोलीस ठाण्यास न देता राहणेकरीता जागा भाडेतत्वावर देतात.

आणि ज्याअर्थी, अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे अस्थायी स्वरूपात भाडे तत्वावर राहणे करीता जागा (फ्लॅट/खोली/घर) घेणाऱ्या भाडेकरू बाबत आवश्यक ती माहिती संबंधीत पोलीस ठाणे येथे उपलब्ध नसल्याने, एखादी अप्रिय घटना घडून कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होण्याची शक्यता असून बेकायदेशीर कृत्यांना चालना मिळू शकते. तसेच भाडेकरू यांचे बाबत इत्यंभूत माहिती उपलब्ध नसल्याने त्यांचा शोध लावण्यात अडचणी येतात.

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेता, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत भाडेतत्वावर राहत असलेल्या व्यक्तींची ओळख व नोंद व्यवस्थित ठेवण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

आणि म्हणून मी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम १६३ मधील संबंधित तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश जारी करीत आहे.

१) सर्व घरमालक/मालमत्ता धारक एजेंट यांनी भाडेकरू ठेवण्यापूर्वी किंवा ठेवल्यानंतर ४८ तासाचे आत त्यांची संपूर्ण माहिती संबंधीत पोलीस ठाण्यात सादर करणे बंधनकारक राहील. सदर माहिती सादर करतांना भाडेकरू त्याचे परिवारातील इतराची संपूर्ण नावे, कायमस्वरूपी पत्ता, पूर्वी राहत असलेल्या ठिकाणचा पुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ओळखपत्रे (आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्रे, वाहन परवाना इ.) छायाचित्रे, भाडे करारनामा, व भाडेकराराचा कालावधी अशी सर्व माहिती संबंधीत पोलीस ठाणे येथे सादर करणे बंधनकारक राहील.

२) भाडेकरू हा परदेशी नागरिक असल्यास त्याचा पासपोर्ट/विसा संपूर्ण माहिती व FRRO नोंदणीची माहिती देणे आवश्यक राहील.

३) सर्व घरमालक/मालमत्ता धारक/एजंट यांनी भाडेकरू ठेवतांना त्यांना पूर्वसूचना न देता व संबंधीत भाडेकरूची संपूर्ण पडताळणीशिवाय कोणालाही राहणे करीता भाडेतत्तवार जागा उपलब्ध करून देऊ नये.

४) बेकायदेशीर स्थलांतरित/कागदपत्र नसलेल्या व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवणे करीता व त्यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करणे करीता पोलीसांकडून तपासणी व पडताळणी मोहिमा राबविण्यात येईल.

५) या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत घरमालक/मालमत्ता धारक/एजेंट हे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ नुसार गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

६) याबाबत सर्व नागरिकांनी पोलीसांना सहकार्य करावे व कोणतीही संशयास्पद बाब त्वरीत जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर कळवावी.

**सदर आदेश दि. 11 / 09 / २०२६ चे ००/०१ वा. पासून ते दि. 09 /11 / २०२६ चे २४/०० वा पर्यंत लागु राहील.**

**हा आदेश दि. 10 / 09 / २०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.**

**ठिकाण — नागपूर शहर**

**(विश्वास नांगरे पाटील)** भापोसे
**पोलीस आयुक्त**
**नागपुर शहर**